**K.P.C. PUBLIC SCHOOL, KHARGHAR**
**ASSESSMENT – 2 (2022-23)**

**GRADE: IV** — **MARKS: 40**
**SUB: MARATHI** — **TIME: 2 HRS**

---

## प्रश्न १.खालील पठित कविता वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा. (५)

| | |
|---|---|
| चार अंकाचा झाला ससा | सात अंकाची झाली गोगलगाय |
| त्याने तर उमटवला कागदावर ठसा. | तिच्या तर म्हणतात आहेत पोटात पाय. |
| पाच अंकाचा झाला बगळा | आठ अंकांची झाली गाय |
| त्याचा तर माशावर डोळा. | तर ती असते सर्वांची माय. |
| सहा अंकाची झाली मेंढी | |
| तिला कशी वाजेल थंडी ? | |

### अ) कवितेच्या ओळी पूर्ण करा.

१. __________झाली मेंढी
तिला कशी_________?

२. ________झाली गोगलगाय ,
तिच्या तर म्हणतात आहेत ________.

### आ) खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.

१. बगळ्याचा डोळा कशावर असतो?
२. सर्वांची माय कोण असते?
३. सशाने कशावर ठसा उमटवला?

## प्रश्न २. खालील शब्दांचे अर्थ लिहून वाक्यात उपयोग करा. (४)

१. बागडणे –
२. सान्निध्य –

## प्रश्न ३. खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा. (५)

१. मुक्तपणे बागडण्यास सुरुवात कोणी केली?
२. शिट्टी कोठे वाजली?
३. प्राणी, पक्षी यांचे आश्रय स्थान कोणते?
४. वनातून पुढे गेल्यावर काय आहे?
५. पाऊस कोणते गाणे घेऊन आला आहे?

## प्रश्न ४. खालील प्रश्नांची थोडक्यात उत्तरे लिहा. (४)

१. बनेश्वर कशासाठी प्रसिद्ध आहे?
२. पाऊस पडल्यानंतर निसर्गात होणारे बदल तुमच्या शब्दात लिहा.

**प्रश्न ५.खालील अपठित उतारा वाचून दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.** **(५)**

चंदा नावाची एक मुलगी होती. ती नदीच्या काठी खेळत होती. खेळता खेळता तिला तहान लागली. नदी तर आटून गेली होती. तिला वाळूत एक लहान खड्डा दिसला. त्याच्यात थोडे पाणी होते. खड्ड्यातील पाणी ओंजळीत घेऊन ते पिणार एवढ्यात एक ससा तिच्याजवळ आला. तो खूप तहानलेला होता. थकून गेला होता. ते पाहून तिने पाण्याची ओंजळ त्याच्या तोंडाजवळ धरली. सशाने गटागटा पाणी पिऊन टाकले व आनंदाने उड्या मारत निघून गेला. चंदाला पण खूप आनंद वाटला.

**अ) रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा.**

१. खेळता खेळता तिला __________लागली.

२. सशाने ________पाणी पिऊन टाकले.

**आ)खालील प्रश्नांची एक-दोन शब्दांत उत्तरे लिहा.**

१. नदीच्या काठी कोण खेळत होते ?

२. लहान खड्डा कोठे होता ?

३. आनंदाने उड्या मारत कोण निघून गेला?

## व्याकरण विभाग

**प्रश्न ६.अ) खालील अंक अक्षरात लिहा.** **(३)**

१. १८ -　　　२. ५ –　　　३. १० -

**आ) खालील वाक्यातील सर्वनामे अधोरेखित करा.** **(४)**

१. आम्ही सहलीला जाणार आहोत.
२. पक्षी झाडावर बसले होते. त्यांचा किलबिलाट चालू होता.
३. बाबा घरी आले. ते थकलेले होते.
४. तिने भावाला ओवाळले.

**इ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **(३)**

१. गाणे –　　　२. ढग –　　　३. सावली -

## लेखन विभाग

**प्रश्न ७. खालील चित्रांचे निरीक्षण करून त्याचे वर्णन लिहा. (कोणतेही एक)** **(३)**

१. 　　किंवा　　२. 

**प्रश्न ८. खालील विषयावर निबंध लिहा.(कोणताही एक)** **(४)**

१. माझी सायकल　　किंवा　　२. पाणी हेच जीवन

*****************************************************